महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका, नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर
दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : rdc.palghar-mh@gov.in

---

**वाचले :**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.

४) Containment Plan Novel Corona virus Disease २०१९ (COVID-१९), Ministry of Health & Family Welfare Govt. Of India.

५) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/Containment Zone/कावि-६५४/२० दि.१६/०४/२०२०.

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दि.१७/०४/२०२०.

७) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/Containment Zone/कार्यवाही बाबत/ कावि-८१७/२० दि.२२/०४/२०२०.

८) मा.भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२०-DM-१(A) दि.०१/०५/२०२०

९) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दि.०२/०५/२०२०, दि.०३/०५/२०२० व दि.१७/०५/२०२०.

---

क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/बाहेरील व्यक्तींना Quarantine करणे/आदेश/कावि-११५७/२० दि.१८/०५/२०२०

## आ दे श :

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.६ व ९ अन्वये कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी एकत्रित सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. सदरच्या सुचनांमध्ये नमुद केल्याप्रमाणे बाहेरच्या राज्यातून/जिल्हयातून तसेच जिल्हाअंतर्गत तालुक्यामधून मजूर वर्ग व इतर रहिवासी यांना आपल्या मूळ गावी जाण्या करिता विशिष्ट अटी व शर्तीवर सुट देण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात अशा व्यक्तींचे मोठया प्रमाणावर आगमन होत असल्याचे दिसून येते. या संदर्भात कोव्हिड-१९ प्रतिबंधाकरिता वेळोवळी सुचना व आदेश निर्गमित करणेत आले आहेत. तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की, अनेक ठिकाणी ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात अशा व्यक्तींची माहिती ठेवणे, त्यांची आरोग्य तपासणी करणे याबाबी काटेकोरपणे होत नाहीत.

ज्याअर्थी, बाहेरुन येणाऱ्या व्यक्तींपासून कोव्हिड-१९ चा संसर्ग पसरणार नाही व बाहेरुन येणा-या व्यक्तींना वैद्यकिय निरीक्षणाखाली ठेवणे आवश्यक आहे व या करिता ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात स्थानिक पातळीवर जबाबदारी देणे व अंमल बजावणी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात (वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून) उपोद्घातातील अ.क्र.६ मधील आदेशातील परिच्छेद क्र.३(i) (ii) व उपोद्घातातील अ.क्र.४ मधील मार्गदर्शकतत्वानुसार खालील प्रमाणे ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात समिती गठित करित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) ग्रामपंचायत क्षेत्र : | संबधित ग्रामपंचायतीचे सरपंच | अध्यक्ष |
| | ग्रामपंचायतीचे सदस्य | सदस्य |
| | तलाठी, कोतवाल,अंगणवाडी सेविका, | सदस्य |
| | मुख्याध्यापक, आशा, आरोग्य सेवक (पुरुष) | |
| | ग्रामसेवक | सदस्य सचिव |
| २) नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्र : | संबंधित वॉर्डातील नगरसेवक | अध्यक्ष व सहअध्यक्ष |
| | मुख्याधिकारी | सदस्य सचिव |

नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात नगराध्यक्ष या कामकाजाचे पर्यवेक्षण करतील.

**या समित्या खालीलप्रमाणे कार्यवाही करतील.**

१) ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात नव्याने बाहेरुन येणा-या व्यक्तींची नोंद ठेवतील व त्याचा तपशिल दररोज तहसीलदार/ गट विकास अधिकारी यांना लेखी सादर करतील. दररोज सकाळी १० वाजेपर्यंत ग्रामीण क्षेत्राकरीता गट विकास अधिकारी / नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता मुख्याधिकारी या नोंदी Google Spreadsheet वर अद्ययावत करतील.

२) या व्यक्तींना ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर १४ दिवसाकरिता स्थानिक पातळीवर संस्थात्मक विलगीकरण (Institutional Quarantine) करतील व त्यांची आरोग्य विभागाने दररोज वैद्यकिय तपासणी केली आहे याची खात्री करतील.

३) ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात संस्थात्मक विलगीकरणासाठी शाळा, सभागृहे व इतर सार्वजनिक जागा निश्चित करतील व त्याठिकाणी शौचालय, पाणी व इतर अनुषंगिक बाबी उपलब्ध करणे- यामध्ये महिला व पुरुष यांची स्वतंत्रपणे व्यवस्था होईल याची दक्षता घ्यावी.

४) ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात असलेल्या संस्थात्मक विलगीकरणात असलेल्या व्यक्तींना त्यांच्या कुटूंबातून दररोजचे जेवण तसेच दैनंदिन दिनचर्याच्या आवश्यकत्या बाबी उपलब्ध होण्या करिता नियोजन करतील, हे करताना सेनिटायझर, सोशल डिस्टसिंग यांचा वापर अनिवार्य आहे. याकरीता सेवाभावी संस्था, तरुण मंडळ, महिला मंडळ, बचत गट, दानशुर व्यक्ती यांची मदत घेण्यात यावी.

५) ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात कोणीही नव्याने बाहेरुन येणारा व्यक्ती थेट कुटूंबामध्ये जाऊन मिसळणार नाही जेणेकरुन कोव्हिड-१९ च्या प्रसारास प्रतिबंध करता येईल, याची दक्षता घेतील.

६) कोव्हिड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधाबाबत ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात आरोग्य विभागाच्या सल्याने जनजागृती करतील.

७) प्रतिबंधीत क्षेत्रातून (Containment Zone) कोणीही व्यक्ती प्रवेश करणार नाही व प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये कोणीही व्यक्ती प्रवेश करणार नाही.

८) अशा व्यक्तींच्या आरोग्याची नियमित तपासणी व आरोग्य सेतू ॲपमध्ये नोंद झाली आहे. याची खात्री करतील.

९) अलगीकरण असलेल्या ठिकाणी वेळोवेळी निर्जंतुकीकरण करतील.

१०) अलगीकरण करण्यात आलेल्या व्यक्ती अनावश्यक कुठेही फिरणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

११) कोव्हिड-१९ आजाराचा संबंधित क्षेत्रात प्रसार होणार नाही याबाबत कार्यवाहीची जबाबदारी समितीची राहील.

१२) वरील बाबत कोणतीही शंका अथवा अडचण असल्यास संबंधित तहसीलदार यांचेशी संपर्क साधावा.

जिल्हाधिकारी ... जिल्हा पा...